# प्रेस नोट

**छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ, मुंबई टर्मिनल - २ येथे विमानामध्ये बॉम्ब असल्याची अफवा पसरवल्याने आरोपीतांना सहार पोलीस ठाणे, मुंबई यांनी ताब्यात घेतलेबाबत..**

दिनांक १४/१०/२०२४ रोजी १.३२ वाजता ते ०३.०९ वाजताच्या दरम्यान इसम नामे Fazluddin Nirban याने त्याच्या @fazluddin69 व @fazluddin27077 या ट्विटर हँडलवरून इंडिगो कंपनीच्या @IndiGo6E या ट्विटर हँडलवर व एअर इंडिया कंपनीच्या @airindia या ट्विटर हँडलवर वरीलप्रमाणे मजकूर लिहून मुंबई ते मस्कत जाणारी 6E1275 व मुंबई ते जेद्दा जाणारी 6E57 या विमानामध्ये बॉम्ब आहे तसेच एअर इंडिया कंपनीच्या मुंबई ते न्यूयॉर्क जाणारी AI-119 विमानामध्ये ०६ किलो आरडीएक्स व सहा आतंकवादी आहेत असे लिहून तिन्ही फ्लाईट्समधील प्रवाशी तसेच एअरपोर्ट परिसरातील नागरिक व प्रवाशांमध्ये भीतीदायक वातावरण निर्माण केले म्हणून वर नमूद @fazluddin69 व @fazluddin27077 या हँडलरचा वापरकर्ता अनोळखी इसम याच्याविरुद्ध कायदेशीर गुन्हा नोंद क्र. ८२३/२०२४ कलम १२५, ३५१(४),३५३(१)(बी) बीएनएस सह नागरी विमानवाहतुक सुरक्षा विरूध्द बेकायदेशिर कारवाई कुत्य कायदा कलम ३(१)(ड) सह बेकायदेशिर कारवाया प्रतिबंधक कायदा कलम १३(ए)(बी) १६, बी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

दिनांक १४/१०/२०२४ रोजी इसम नामे ..... या इसमाने विमानतळावरील दुरध्वनी क्रमांकवर संपर्क साधुन माहिती दिली की, सदर विमानात बॉम्ब व आरडीएक्स तसेच आंतकवादी असल्याबाबतचे धमकीचे ट्विट करणारा इसम हा त्याचे ओळखीचा म्हणजेच जिल्हा राजनांदगांव, छत्तीसगड येथील असल्याबाबत माहिती दिली. सदर माहितीच्या अनुषंगाने पोनि बारेसे व पथक तपासकामी नमुद पत्त्यावर गेले असता माहिती मिळाली की, विमानतळावर संपर्क साधुन गुन्हयाबाबत माहिती देणारा इसम .... हा अल्पवयीन असुन त्यांनीच सदरचे कृत्य केल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले.

सदर इसम हा अल्पवयीन असल्याने त्यास पुढील चौकशी कामी सहार पोलीस ठाणे मुंबई येथे हजर रहाणेबाबत त्याचे वडील नामे मांगीलाल अगरवाल यांना सांगितले असता ते दिनांक १४/१०/२०२४ रोजी पोलीस ठाणे हजर झाले. तरी त्याच्या वडिलांसमक्ष केलेल्या अधिक चौकशीमध्ये विधीसंघर्षग्रस्त बालकाचा नमूद गुन्ह्यात सहभाग निश्चित झाल्याने त्यास पुढील कार्यवाही कामी बाल न्यायालय डोंगरी यांचे समोर हजर केले आहे. मा. बाल न्यायालयाने पुढील तारीख दिनांक २४/१०/२०२४ रोजी पर्यत ताब्यात घेतले आहे.

तसेच यातील दुसरा पाहिजे आरोपी यास पोनि बारेसे व पथक यांनी ताब्यात घेवुन चौकशीकामी पोलीस ठाणेस हजर केले असुन त्यांचेकडे तपास चालु आहे.

सदर गुन्हयाचा तपास हा मा .विवेक फणसळकर, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. देवेन भारती, विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. सत्यनारायण चौधरी, सह पोलीस आयुक्त (कायदा व सुव्यवस्था), मुंबई, मा. परमजीतसिंह दहिया, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, मुंबई, मा. मनीष कलवानिया, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -८ यांचे मार्गदर्शनाखाली श्री. दौलत साळवे, सपोआ विमानतळ विभाग, मुंबई पोनि. मंगेश बोरसे, पोउनि सुशांत बावचकर, पोउनि प्रसन्नजित कदम, पोउनि अमोल मांजरे व पथक, पो.शि. सागर गायकवाड (तांत्रिक मदत) सहार पोलीस ठाणे यांनी केला आहे.

-----